


# बीडीडी चाळ 'अत्यावश्यक प्रकल्प' म्हणून घोषित करा - मुख्यमंत्री

## पायाभूत सुविधा वॉर रुम बैठकीत विकास प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

राज्यातील सुरू असलेले विकास प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावे. हे प्रकल्प सुरू असताना येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर करण्यात याव्यात तसेच नवीन प्रकल्प दोन ते अडीच वर्षात पूर्ण झाले पाहिजे, असे नियोजन करण्यात यावे. विविध विकास प्रकल्प तयार करताना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. बीडीडी चाळ हा अत्यावश्यक प्रकल्प म्हणून घोषित करण्याची सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मुंबई उपनगर, ठाणे व पुणे येथे सुरू असलेल्या पायाभूत विकास प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित प्रकल्पाचे कंत्राटदार उपस्थित होते. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई मेट्रो लाईन - 2 - बी ही डी.एन.नगर ते डायमंड गार्डन-मंडाले या मार्गाने धावणार असून यात 19 स्टेशन्स असणार आहे. हा मेट्रो प्रकल्प 31 मार्च 2027 पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, स्वामी समर्थनगर ते विक्रोळी ही मेट्रो लाईन 31 डिसेंबर 2026 पर्यंत पूर्ण करण्यात यावी. याकरिता नगरविकास विभागाने श्याम नगर स्टेशन येथील जमिनीसंदर्भातील अडचणी 15 दिवसात सोडवाव्यात. शिवडी ते वरळी हा जोडमार्ग प्रकल्प दिवसरात्र कामे करून पूर्ण करण्यात यावा. जे प्रकल्प मागे पडले ते वेळेत कसे पूर्ण होतील, यासाठी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदाराने लक्ष देण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत मान-हिंजेवाडी-शिवाजीनगर या मेट्रो लाईन 3 चे कामकाज 31 मार्च 2026 पर्यंत पूर्ण होणार आहे. नायगाव येथील बीडीडी चाळ प्रकल्प जून 2029 पर्यंत पूर्ण तर वरळी येथील प्रकल्प मे 2029 पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना केल्या. मुंबईतील एन.एम. जोशी बीडीडी चाळ प्रकल्प हा जून 2031 पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'बीडीडी चाळ' प्रकल्पास अत्यावश्यक प्रकल्प म्हणून घोषित करण्याची सूचना केली.



ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्प, उत्तन विरार सी लिंक प्रकल्प, ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह शहरी बोगदा प्रकल्प योग्य नियोजन करून वेळेत पूर्ण होईल, असे पाहण्याचे निर्देश देवून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ऐरोली-कटई नाका फ्रीवे प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ 20 मिनिटावर येणार आहे. यासाठी जमीन अधिग्रहणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तात्काळ रक्कम द्यावी असेही निर्देश दिले.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरणामार्फत वडपे-ठाणे हा 23.8 कि.मी. रस्ता बांधकाम सुरू असून यातील 19 किमीचा रस्ता तयार झाला असून संपूर्ण रस्ता मार्च 2026 पर्यंत पूर्ण होणार आहे. हा रस्ता समृद्धी महामार्गासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

त्याचबरोबर मुंबई पुणे मिसिंग लिंकचे काम लवकर पूर्ण करण्यात येणार आहे. वांद्रे -वर्सोवा सी लिंक प्रकल्पाचे काम धीम्या गतीने सुरू असल्याबाबत मुख्यमंत्र्यांनी यावेळी नाराजी व्यक्त केली. हा प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी संबंधित कंत्राटदाराने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वेळेत कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले.

मुंबई महानगरपालिकेमार्फत मागाठाणे-गोरेगाव डी.पी.रोडचे सुरू असून यासाठी जमीन अधिग्रहणाबरोबरच प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात येणारे निवासस्थानाचे काम गतीने पूर्ण करण्यात यावे. प्रकल्पाग्रस्तांकरिता बांधण्यात येणाऱ्या घरांसाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात यावा. ज्या ठिकाणी आवश्यकता असेल तेथे जुनी प्रकल्पबाधितांची घरे नवीन तंत्रज्ञानाने तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. फिल्म सिटी गोरेगाव ते खिंडीपाडा मुलुंड येथे दुहेरी बोगद्यांचे काम वेळेत पूर्ण होण्यासाठी कंत्राटदारांनी जास्त मनुष्यबळ नियुक्त करावे. या प्रकल्पामुळे पश्चिम उपनगरातील नागरिक नवी मुंबई विमानतळाकडे सहज पोहचू शकणार आहेत. वर्सोवा ते दहिसर ते भाईंदर या मुंबई कोस्टल रोड प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून खार जमिनीची परवानगी मिळाली असून हा प्रकल्प 30 डिसेंबर 2028 पर्यंत पूर्ण होण्यासाठी वेगवेगळे टप्पे करण्याचे आदेशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यासोबतच महावितरण,जलसंपदा आणि सिडको यांच्यामार्फत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला.

# मुंबईत अब्जावधींचा पीएपी घोटाळा?

## महायुती सरकारवर काँग्रेसचा थेट आरोप!

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंबईत पुन्हा एकदा गृहनिर्माण प्रकल्पांच्या नावाखाली मोठा आर्थिक घोटाळा उघडकीस आल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला आहे. मुंबई काँग्रेस अध्यक्षा तथा खासदार वर्षा गायकवाड यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत संतप्तपणे सांगितले की, मालाड येथील प्रकल्पग्रस्तांसाठी (PAP) असलेल्या गृहनिर्माण योजनेत तब्बल 5000 कोटींचा घोटाळा झाला आहे!



गायकवाड म्हणाल्या की, या प्रकरणात राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेने एकाच बिल्डरला अनुचित लाभ मिळावा म्हणून पर्यावरण व नियोजन नियमांची पायमल्ली केली. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या "नो डेव्हलपमेंट झोन" मधील जमीन गुपचूपपणे निवासी क्षेत्रात रूपांतरित करण्यात आली. ही जमीन मूळतः पोलिस निवासस्थानांसाठी राखीव होती; परंतु पोलिसांचे घरकुल न उभारता ती व्यापारी प्रकल्पासाठी वळवण्यात आली, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

गायकवाड यांनी सांगितले की, "या प्रकल्पाच्या नावाखाली अद्याप एकही वीट रचली गेलेली नाही, तरी मुंबई महानगरपालिकेने ९४८.२४ कोटींच्या क्रेडिट नोट्स जारी केल्या आणि १०.४४ लाख चौरस फूट जमीन हस्तांतरित केली आहे. यामुळे महापालिकेचे कोट्यवधींचे नुकसान झाले, तर बिल्डरला अब्जावधींचा फायदा झाला."

त्यांनी पुढे सांगितले की, हा प्रकल्प "महत्वाचा" म्हणून घोषित करून जवळपास सर्व विकास शुल्क आणि प्रीमियम माफ करण्यात आले — परिणामी महापालिकेला सुमारे १०० कोटी रुपयांचे नुकसान झाले, आणि बिल्डरने कोणतेही बांधकाम पूर्ण न करता १००० कोटींपेक्षा जास्त नफा कमावला.

या पार्श्वभूमीवर मालाड पीएपी प्रकल्प त्वरित रद्द करून उच्चस्तरीय चौकशी सुरू करावी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई व्हावी, अशी ठाम मागणी वर्षा गायकवाड यांनी केली आहे. त्यांनी या प्रकरणाला "मुंबईच्या इतिहासातील सर्वात मोठा पीएपी घोटाळा" असे संबोधले असून, "हा मुंबईकरांच्या विश्वासावरचा विश्वासघात आहे," असा थेट आरोप महायुती सरकारवर केला आहे.

# एकल महिलांना विविध योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी विशेष अभियान राबवावे - उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

एकल महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळवून देण्याची गरज आहे. त्यासाठी राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटनिहाय विशेष अभियान राबवावे,असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह गृह येथे एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुणे जिल्हा परिषदेने सुरू केलेल्या मोहिमेच्या धर्तीवर राज्यस्तरावर अभियान राबविण्याबाबत बैठक झाली. यावेळी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव तथा पुणे जिल्ह्याच्या पालक सचिव व्ही. राधा, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वित्त विभागाच्या सचिव शैला ए., ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महिला व बाल विकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ.निपुण विनायक, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, एकल महिलांना समाजात सन्मानाची वागणूक देणे, मालमत्तेचे हक्क देणे, आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, त्यांना आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम करून स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करावे. केरळ आणि तामिळनाडू या राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रात एकल महिलांना पुनर्विवाहासाठी आर्थिक मदत करावी. पात्र एकल महिला लाभार्थींना सुद्धा घरकुल योजनेचा लाभ द्यावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.


राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून राज्यस्तरीय संगणकीय डेटाबेस प्रणाली तयार करणे, अंगणवाडी सेविका निवड प्रक्रियेप्रमाणे शासन निर्णयात बदल करून एएनएम, स्टाफ नर्स निवड आणि एनएचएम भरती प्रक्रियेत एकल महिलांना प्राधान्य देणे, त्यांना शासकीय कागदपत्रे उपलब्ध करून देणे, व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देणे, एकल महिलांसाठी गाव पातळीवर जागरूकता शिबिरे आणि मार्गदर्शन सत्र आयोजित करणे,अशा विविध विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

# भारतीय महिला क्रिकेट संघाचा ऐतिहासिक विश्वविजय

## क्रीडामंत्री कोकाटेंकडून अभिनंदन

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

संपूर्ण देशभरात भारतीय नागरिक तिरंगा हातात घेऊन अभिमानाने विश्वविजयाचा आनंद साजरा करत आहेत. भारतीय महिला क्रिकेट संघाने इतिहास रचत विश्वविजेतेपद पटकावले असून, त्यांच्या या अभूतपूर्व यशाने संपूर्ण देशाचे मस्तक अभिमानाने उंचावले असल्याच्या भावना व्यक्त करत क्रीडा मंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी विश्वकप विजेत्या महिला क्रिकेट चमूला शुभेच्छा दिल्या.



राज्याचे क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी संघाचे अभिनंदन करताना म्हटले की, "संधी मिळाली तर भारतीय मुली जग जिंकू शकतात, हे आपल्या महिला खेळाडूंनी सिद्ध करून दाखवले आहे."

'क्रिकेट इज अ जेंटलमन्स गेम' ही संकल्पना आज आपल्या रणरागिणींनी मोडीत काढली, असे सांगत ते म्हणाले की या विजयी महिलांनी जगाला दाखवून दिलं की जेंटलवूमन मध्ये देखील क्षमता, गुणवत्ता आणि संघर्षपूर्ण समानता आहे.

भारतीय स्त्रिया आता चूल आणि मूल यापलीकडे जाऊन कर्तृत्वाच्या नव्या सीमारेषा गाठत आहेत. महिला क्रिकेट संघाच्या या विजयाने हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की भारतीय मुली कोणत्याही अर्थाने मुलांपेक्षा कमी नाहीत . त्या अधिक जिद्दी, जाज्वल्य आणि समर्थ आहेत, असेही क्रीडामंत्री ॲड.माणिकराव कोकाटे म्हणाले.

# एसटीच्या मोकळ्या जागांवर उगवणार 'सौरसूर्य'

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

राज्याच्या एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी मोठी झेप घेतली जात आहे. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी 'एसटी सौर ऊर्जा हब' उभारण्याची घोषणा केली असून, या माध्यमातून दरवर्षी तब्बल ३०० मेगावॅट वीज निर्मिती आणि १ हजार कोटी रुपयांची बचत करण्याचं लक्ष्य ठेवण्यात आलं आहे.

मुंबईत झालेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना सरनाईक म्हणाले की, "एसटीच्या मोकळया जागा, कार्यशाळा आणि बसस्थानकांच्या छतांवर सौर पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती केली जाणार आहे. या प्रकल्पामुळे केवळ ऊर्जा स्वावलंबन नव्हे, तर एसटीसाठी एक नवा उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल." सध्या एसटीला वार्षिक सुमारे १५ मेगावॅट वीज लागते, ज्यासाठी २५ ते ३० कोटी रुपये खर्च होतात. भविष्यात इलेक्ट्रिक बसेसच्या चार्जिंगसाठी अतिरिक्त २८० मेगावॅट वीज लागणार असल्याने ही ऊर्जा स्वतः तयार केल्यास मोठ्या प्रमाणावर आर्थिक बचत शक्य आहे, असे त्यांनी सांगितले. या प्रकल्पासाठी एसटी महामंडळाच्या मोकळया जागांव्यतिरिक्त शासनाच्या ओसाड जमिनींचा वापर करण्यात येणार असून, आवश्यक त्या ठिकाणी नाममात्र भाड्याने जागा उपलब्ध करून देण्याचं नियोजन आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांमधून मिळणाऱ्या अनुदानाचा देखील उपयोग केला जाणार आहे. सौरऊर्जेच्या माध्यमातून 'स्वावलंबी एसटी' उभारण्याचा हा प्रयत्न केवळ वाहतूक क्षेत्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण राज्यासाठी पथदर्शक प्रकल्प ठरेल, असा विश्वास प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग,**
**सा.बां. विभाग, वरळी, मुंबई**
**निविदा सुचना क्रमांक ४१/२०२५-२६**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, वरळी, मुंबई हे सा.बां. विभागात अनुभवी ठेकेदार यांचेकडुन कामांच्या ऑनलाईन निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना व सविस्तर निविदा सुचना https://mahapwd.gov.in या संकेत स्थळावर दिनांक ०३.११.२०२५ ते दि. १०.११.२०२५ सायंकाळी ५.३० पर्यंत ऑनलाईन डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध होतील. तसेच निविदा दि. १३.११.२०२५ रोजी सकाळी ११.०० नंतर (शक्य असल्यास) उघडण्यात येईल.

टीप :- या निविदा सुचनेमध्ये एकुण १४ कामे समाविष्ट असुन सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बां. विभाग, वरळी, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर निविदा सुचना पहावयास मिळेल.

(उपरोक्त काम हे ३ ते १० लाखामधील आहे.)

**जा.क्र.काअ/मर्मुविवि/निविदा/ ३५७४/२०२५**
**दि. २८/१०/२०२५**

-sd-
**कार्यकारी अभियंता**
**मध्य मुंबई विद्युत विभाग,**
**सा.बां. विभाग, वरळी, मुंबई**

**डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C३७५७**



**ANAND RATHI**
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०००६३ भारत
**Phone:** +91 8451942710 | **Website:** www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली अनुसूचीतील स्थावर मालमत्ता इतर गोष्टींसह सुरक्षित आहे आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजिएफएल (सुरक्षित कर्जदार) ज्याचा कर्ज खाते क्रमांक **APPL00008974** आहे आणि ज्याचा रचनात्मक ताबा आहे, तो ऑनलाइन ई–लिलावाद्वारे **https://sarfaesi.auctiontiger.net** वेबसाइटद्वारे ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला विकला जाईल, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेची आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून खाली नमूद केल्याप्रमाणे वसूल होण्याच्या तारखेपर्यंतचे इतर खर्च आणि शुल्क वसूल करण्यासाठी:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स हॅपी ट्रॅव्हल्स (कर्जदार) बी/४७, दुसरा मजला, शरद इंडस्ट्रियल इस्टेट, एलबीएस मार्ग, लेक रोड, भांडुप (पश्चिम), मुंबल: ४०००७८. | |
| सह–कर्जदाराचे नाव: (२) श्री. सोलोमन मोझेस नाडर (सह–कर्जदार) एफ/९०२ ९वा मजला, आशा किरण समर्थ गार्डन, प्लॉट क्रमांक ८, दत्त मंदिर रोड, भांडुप (पश्चिम), मुंबई: ४०००७८. (३) सुश्री सोफिया सोलोमन नाडर (सह–कर्जदार) एफ/९०२ ९वा मजला, आशा किरण समर्थ गार्डन, प्लॉट क्रमांक ८, दत्त मंदिर रोड, भांडुप (पश्चिम), मुंबई: ४०००७८. (४) मेसर्स हॅपी ट्रान्सपोर्ट (सह–कर्जदार) बी/४७, दुसरा मजला, शरद इंडस्ट्रियल इस्टेट, एलबीएस मार्ग, लेक रोड, भांडुप (पश्चिम), मुंबई: ४०००७८. | |
| मालमत्तेचा पत्ता: युनिट क्रमांक ४७, दुसरा मजला, इमारत क्रमांक बी, शरद इंडस्ट्रियल इस्टेट, लेक रोड, एस क्रमांक १४०, सीटीएस क्रमांक २०३ अ, भांडुप गाव, भांडुप पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र | |
| थकबाकी रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | रु. ८५,४३,४११/– (रुपये पंच्याऐंशी लाख त्रेचाळीस हजार चारशे अकरा फक्त) |
| लिलावाची तारीख | ९ डिसेंबर २०२५ |
| राखीव किंमत | रु. १,५०,३४,५००/– (रुपये एक कोटी पन्नास लाख चौतीस हजार पाचशे फक्त) |
| कमालमत्ता ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. २५,०००/– (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २ डिसेंबर २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रे/ईएमडीचा पुरावा इत्यादींसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ | ५ डिसेंबर २०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ९ डिसेंबर २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार / खरेदीदार लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ३ नोव्हेंबर २०२५ स्वा/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण: मुंबई अधिकृत स्वाक्षरीकर्ता



**ANAND RATHI**
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०००६३ भारत
**Phone:** +91 8451942710 | **Website:** www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली अनुसूचीतील स्थावर मालमत्ता इतर गोष्टींसह सुरक्षित आहे आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजिएफएल (सुरक्षित कर्जदार) ज्याचा कर्ज खाते क्रमांक **APPL00014015** आहे आणि ज्याचा रचनात्मक ताबा आहे, तो ऑनलाइन ई–लिलावाद्वारे **https://sarfaesi.auctiontiger.net** वेबसाइटद्वारे ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला विकला जाईल, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेची आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून खाली नमूद केल्याप्रमाणे वसूल होण्याच्या तारखेपर्यंतचे इतर खर्च आणि शुल्क वसूल करण्यासाठी:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स एएल एंटरप्रायजेस (कर्जदार),• युनिट क्रमांक २०१, दुसरा मजला, माधनी इंडस्ट्रीज इस्टेट, ५४२, सेनापती बापट मार्ग, दादर पश्चिम, मुंबई: ४०००२८. • ऑफिस क्रमांक ३०६, पलई कमर्शियल कॉम्प्लेक्स, तुलसी पाईप रोड, दादर (पश्चिम), मुंबई: ४०००२८ | |
| सह–कर्जदाराचे नाव : (२) श्री. करसन मुरजी पटेल (सह–कर्जदार), १०४, हवा महाल को–ऑप हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, शिवाजी चौक, दफ्तरी रोड, समोर. हिरा कुटीर, मालाड पूर्व मुंबई: ४०००९७. (३) श्रीमती अरुणा करसन पटेल (सह कर्जदार), १०४, हवा महल को ऑप हाउसिंग सोसायटी लि.,शिवाजी चौक, दफ्तरी रोड, समोर. हिरा कुटीर, मालाड पूर्व मुंबई: ४०००९७. | |
| मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट नं. २०२, दुसरा मजला, गणेश मनीष सीएचएसएल पोईसर गावातील सीटीएस क्रमांक ३१९, आनंदवन आश्रमाजवळ, नारायण जोशी रोड, डॉ. दळवी रोड समोर, कांदिवली पश्चिम, ता. बोरिवली जिल्हा मुंबई–४०००६७, मुंबई, महाराष्ट्र, भारत | |
| थकबाकी रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | रु. ९४,५९,९८४/– (रुपये चौरसावी लाख एकोणसाठ हजार नऊशे चौरासी फक्त) |
| लिलावाची तारीख | ९ डिसेंबर २०२५ |
| राखीव किंमत | रु. १,०३,७६,१९०/– (रुपये एक कोटी तीन लाख छयात्तर हजार एकशे नव्वद फक्त) |
| कमालमत्ता ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/– (रुपये दहा हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २ डिसेंबर २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रे/ईएमडीचा पुरावा इत्यादींसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ | ५ डिसेंबर २०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ९ डिसेंबर २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार / खरेदीदार लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ३ नोव्हेंबर २०२५ स्वा/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण: मुंबई अधिकृत स्वाक्षरीकर्ता


# सेव्हन हिल्स हॉस्पिटल खाजगीकरणाच्या मार्गावर?

## अंधेरीत ६ नोव्हेंबरला तीव्र आंदोलनाची हाक

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंबईतील अंधेरी येथील अत्याधुनिक सेव्हन हिल्स हॉस्पिटल पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या बहुमजली रुग्णालयाचा ताबा उद्योगपती मुकेश अंबानींना देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप अंधेरी विकास समितीने केला असून, या निर्णयाविरोधात येत्या ६ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा समितीने दिला आहे.




मुंबईकरांच्या आरोग्याच्या हक्कासाठी लढा देण्याचा निर्धार व्यक्त करत समितीचे प्रमुख आणि काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश शर्मा यांनी म्हटले की, "सेव्हन हिल्स हॉस्पिटल हे मुंबई महापालिकेचेच आहे. ते खाजगी उद्योगपतींना देणे म्हणजे नागरिकांच्या हिताला तिलांजली देणे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व बीएमसीकडे सातत्याने पाठपुरावा करूनही प्रतिसाद मिळत नाही, हे दुर्दैवी आहे."

शर्मा यांनी पुढे सांगितले की, या जागेचा मूळ मालकी हक्क मुंबई महानगरपालिकेकडे असून, ती लीजवर देण्यात आलेली आहे. "जर महानगरपालिकेने ही जागा स्वतःच्या ताब्यात घेतली, तर येथे अत्याधुनिक वैद्यकीय संशोधन केंद्र, मेडीकल व नर्सिंग कॉलेज सुरू करून मुंबईकरांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे हॉस्पिटल उभारता येईल," असे त्यांनी स्पष्ट केले.

अंधेरीच्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या रुग्णालयाची बाजारभावानुसार किंमत सुमारे ३ ते ४ हजार कोटी रुपये आहे. परंतु राजेश शर्मा म्हणाले, "या जागेकडे व्यापारी दृष्टीकोनातून नव्हे तर मानवी दृष्टीकोनातून पाहावे. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर हे हॉस्पिटल मुंबईकरांसाठी आरोग्यसेवेचे नवे केंद्र ठरू शकते."

आता या आंदोलनाला नागरिकांचा किती प्रतिसाद मिळतो आणि सरकार कोणती भूमिका घेते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.


**ANAND RATHI**
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०००६३ भारत
**Phone:** +91 8451942710| **Website:** www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली अनुसूचीतील स्थावर मालमत्ता इतर गोष्टींसह सुरक्षित आहे आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजिएफएल (सुरक्षित कर्जदार) ज्याचा कर्ज खाते क्रमांक **APPL00002292** आहे आणि ज्याचा रचनात्मक ताबा आहे, तो ऑनलाइन ई–लिलावाद्वारे **https://sarfaesi.auctiontiger.net** वेबसाइटद्वारे ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला विकला जाईल, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेची आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून खाली नमूद केल्याप्रमाणे वसूल होण्याच्या तारखेपर्यंतचे इतर खर्च आणि शुल्क वसूल करण्यासाठी:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) श्री. शर्मा फर्निचर (कर्जदार) फ्लॅट क्रमांक ७१३, ७वा मजला, ए विंग, बिल्डिंग क्रमांक २, न्यू महाकाली नगर, एसआरए सीएचएस लिमिटेड, मार्वेक्रॉस रोड, टाटा पॉवर हाऊस जवळ, मालाड वेस्ट, मुंबई: ४०००९५. | |
| सह–कर्जदाराचे नाव : (२) सर्व श्री. अरमोद कमलदेव शर्मा (मृत्यूनंतर) (सह–कर्जदार) यांचे कायदेशीर वारस फ्लॅट क्रमांक ७१३, ७वा मजला, ए विंग, बिल्डिंग क्रमांक २, न्यू महाकाली नगर, एसआरए सीएचएस लिमिटेड, मार्वेक्रॉस रोड, टाटा पॉवर हाऊस जवळ, मालाड वेस्ट, मुंबई: ४०००९५. (३) सर्व श्रीमती रुमालादेवी अरमोद शर्मा (मृत्यूनंतर) यांचे कायदेशीर वारस (सह–कर्जदार) फ्लॅट क्रमांक ७१३, ७ वा मजला, ए विंग, बिल्डिंग क्रमांक २, न्यू महाकाली नगर, एसआरए सीएचएस लिमिटेड, मार्वेक्रॉस रोड, टाटा पॉवर हाऊसजवळ, मालाड पश्चिम, मुंबई: ४०००९५. (४) श्री. राम अरमोद शर्मा (सह–कर्जदार) फ्लॅट क्रमांक ७१३, ७वा मजला, ए विंग, बिल्डिंग क्रमांक २, न्यू महाकाली नगर, एसआरए सीएचएस लिमिटेड, मार्वेक्रॉस रोड, टाटा पॉवर हाऊसजवळ, मालाड पश्चिम, मुंबई: ४०००९५. | |
| मालमत्तेचा पत्ता: ऑफिस क्रमांक ०६, ग्राउंड फ्लोअर, बिल्डिंग क्रमांक सी२, हरि ओम एसआरए सीएचएसएल, गोकुळ धाम कॉलनी, कन्या पाडा रोडच्या बाहेर, सीटीएस क्रमांक ५२०, गाव मालाड पूर्व, गोरेगाव (पूर्व), मुंबई: ४०००६३. | |
| थकबाकी रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | २२,८२,०३०/– (बावीस लाख ब्यांशी हजार तीस रुपये फक्त) |
| लिलावाची तारीख | ९ डिसेंबर २०२५ |
| राखीव किंमत | ४०,८२,४००/– रुपये (चाळीस लाख ब्यांशी हजार चारशे रुपये फक्त) |
| कमालमत्ता ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | १०,०००/– रुपये (दहा हजार रुपये फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २ डिसेंबर २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रे/ईएमडीचा पुरावा इत्यादींसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ | ५ डिसेंबर २०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ९ डिसेंबर २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार / खरेदीदार लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ३ नोव्हेंबर २०२५ स्वा/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण: मुंबई अधिकृत स्वाक्षरीकर्ता



**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**स्वारस्य अभिव्यक्ती**

पी/दक्षिण विभागाच्या हद्दीत अनधिकृत फेरीवाले व बॅनर पोस्टर अंतर्गत कारवाई करणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अशासकीय संस्थांकडून मोहरबंद स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज मागविण्यात येत आहे.

स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण हयांच्या कार्यालयात रु.3300/- + 18% (जीएसटी) रोखीने दि. 04/11/2025 ते 10/11/2025 रोजी स. 11.00 ते दु.04.00 वा. पर्यंत विकत मिळतील.

इच्छूक अशासकीय संस्था महानगरपलिकेच्या संकेतस्थळावर visit http://portal.mcgm.gov.in भेट देऊन स्वारस्य अभिव्यक्ती अर्जासाठी वरिष्ठ निरिक्षक (अतिक्रमण) पी/दक्षिण यांच्याशी संपर्क करावा.

इच्छूक संस्थांनी आपले अर्ज वरिष्ठ निरिक्षक (अतिक्रमण) पी/दक्षिण हयांच्या कार्यालयात दि. 04/11/2025 ते 10/11/2025 रोजी स.11.00 ते दु.04.00 वा. पर्यंत सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी व वेळेनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. सदर योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी 01 संस्थेची दि. 10/11/2025 रोजी संध्या. 05.00 वा अथवा या कार्यालयाच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

सोडती बाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

**सही/-**
**सहाय्यक आयुक्त,**
**पी/दक्षिण (प्र)**

**पीआरओ/२०९१/जाहि./२०२५-२६**

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा